जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५४५ दिनांक - १५/०७/२०२३**

पोलीस आयुक्तालय, पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये

## कोंम्बींग ऑपरेशन राबवुन सराईत गुन्हेगारांवर केली प्रतिबंधक कारवाई

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री. रितेश कुमार,यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये कोंम्बींग ऑपरेशन करुन गुन्हेगारांना चेकींग करुन प्रतिबंधक कारवाई करणे, तसेच हॉटेल/लॉजेस/ढाबे, एस. टी. व बस स्थानके, रेल्वे स्टेशन, तसेच सार्वजनिक ठिकाणी आढळून येणारे संशयीत इसम/घटना इत्यादी कसून तपासणी करणे बाबत आदेश दिले होते. त्याप्रमाणे पुणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधे गुन्हे शाखा व पोलीस ठाणे कडील अधिकारी व अंमलदार यांची पथके स्थापन करुन पुणे शहरातील वेगवेगळया परीसरात दिनांक १४/०७/२०२३ रोजी रात्रौ २२.०० ते दिनांक १५/०७/२०२३ रोजी ०२.०० वा. पर्यत कोंम्बींग ऑपरेशन व तपासणी करुन खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

**आरोपी चेकींग अभियानमध्ये एकुण १८२४ गुन्हेगारांना चेक करण्यात आले असून त्यापैकी ५७७ गुन्हेगार मिळुन आले आहेत.**

विशेष मोहिमे दरम्यान पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये एकुण १३ आर्म ॲक्ट गुन्ह्यांमध्ये एकुण १३ आरोपी अटक करुन त्यांचेकडुन २ पिस्टल, ७ जिवंत काडतुसे, तसेच १२ धारदार हत्यारे असा एकुण रु. ८५,५००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ १ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

परिमंडळ १ मध्ये विशेष मोहीम दरम्यान गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले एकुण २ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. मपोका १४२ प्रमाणे १ केस करुन १ आरोपीस अटक केली आहे. तसेच प्रोव्हिबिशन प्रमाणे ३ केसेस करण्यात आलेल्या असुन ३ आरोपींकडुन रु. ३३५०/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण २ केसेस करुन २ आरोपींकडुन रु. ३३००/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ २ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :-**

परिमंडळ-२ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले एकुण ३ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. मपोका १४२ प्रमाणे १ केस करुन १ आरोपी अटक केला आहे. तसेच प्रोव्हिबिशन प्रमाणे ७ केसेस करण्यात आलेल्या असुन ७ आरोपींकडुन रु. ७,६३०/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण ३ केसेस करुन ३ आरोपींकडुन रु. ३,२९०/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ३ मधील एकुण ६ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

परिमंडळ-३ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले एकुण १ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. तसेच प्रोव्हिबिशनमध्ये एकुण ११ केसेस करुन १२ आरोपीकडुन रु. ६,९८०/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण २ केसेस करुन ४ आरोपींकडुन रु. १,१९५/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ४ मधील एकुण ७ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

परिमंडळ-४ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान गुन्ह्यात निष्पन्न परंतू अटक नसलेले एकुण ११ आरोपी अटक करण्यात आलेले आहे. मपोका १४२ प्रमाणे १ कारवाई करुन १ आरोपी अटक केला आहे. तसेच प्रोव्हिबिशनमध्ये एकुण १४ केसेस करुन १४ आरोपीकडुन रु. ९,५२०/- चा तसेच जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण ११ केसेस करुन ३३ आरोपींकडुन रु. २२,४४५/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**परिमंडळ ५ मधील एकुण ४ पोलीस स्टेशनमधील केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

परिमंडळ-४ मध्ये विशेष मोहिमे दरम्यान प्रोव्हिबिशन ॲक्ट प्रमाणे एकुण २ केसेस मध्ये २ आरोपी यांना अटक करुन त्यांचेकडुन रु. १,६००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन एनडीपीएस प्रमाणे १ कारवाई करुन १ आरोपीकडुन ३ ग्रॅम एमडी रु. ९,५००/- चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

**गुन्हे शाखेने केलेली कारवाई खालीलप्रमाणे :**

- गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईमध्ये मपोका १४२ प्रमाणे २ कारवाया करुन २ आरोपीस अटक केली आहे.
- आरोपी संतोष विनायक नातु वय ४७ रा. पिंपळगांव, ता. दौंड, पुणे यास अटक करुन त्याचे ताब्यातुन २ गावठी पिस्तुल व ७ जिवंत काडतुसे असा रु. ८१,४००/- चा मुद्देमाल जप्त करुन त्याचेविरुद्ध पर्वती पो.स्टे. गुरनं. २००/२०२३ आर्म्स ॲक्ट ३/२५, मपोका ३७ (१)(३) १३५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.
- यवत पो.स्टे. भादवी कलम ४८१/२०२३ भा.द.वी.कलम ३९२,३४ या गुन्हयातील आरोपी १) हादीहसन सर्फराज इराणी वय २३ रा.पाटील इस्टेट, शिवाजीनगर,पुणे व १ विधीसंघर्षित बालक वय १७ रा.पाटील इस्टेट, शिवाजीनगर, पुणे यास ताब्यात घेऊन त्यांचेकडुन हडपसर ३, सहकारनगर १, भारती विद्यापीठ १ असे इतर ५ चेन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.
- आरोपी १) भगवान विश्वनाथ सदार, वय ३८, रा. पिंपळे गुरव, पुणे मुळगांव चतारी, ता.पातुर, जि. आकोला २) सुभाष सुरेश सदार, वय २६, रा. पातुर जि. आकोला यांचेकडुन पुणे शहरातील मुंढवा १, वारजे माळवाडी १, चतुःश्रृंगी १, लोणी काळभोर १ व हडपसर १ असे एकुण ५ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले.
- आरोपी  जावेद युसुफअली इराणी वय २७, रा. शिवाजीनगर, पुणे यांचेकडुन पुणे शहरातील मुंढवा १, वानवडी १ व हडपसर १ असे एकुण ३ वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

**सदर विशेष मोहिमे दरम्यान एकुण कारवाईचा आढावा घेतला असता खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.**

- खडक, शिवाजीनगर, विश्रामबाग, सहकारनगर, सिंहगड रोड, वारजे माळवाडी, पर्वती, चतुःश्रृंगी, येरवडा व विमानतळ पोलीस स्टेशनने बेलेबल व नॉन बेलेबल वारंट बजावणी  उत्कृष्ठपणे केलेली आहे.
- मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट प्रमाणे एकुण गुन्हे शाखेने ६ केसेस करुन ६ आरोपींकडुन रोख व गावठी दारु असा रु. १३,५२०/- व पोलीस स्टेशनने ३७ केसेस करुन ३८ आरोपींकडुन रु. २९,०८०/- मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
- महा.जुगार ॲक्ट प्रमाणे पोलीस स्टेशनने १८ केसेस करुन त्यामध्ये ४२ आरोपींना अटक करुन जुगार साहित्य व रोख रु. ३०,२३०/- व गुन्हे शाखेने जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण १ केस करुन ४ आरोपींकडुन रु. ३,१९०/- चा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

➢ सीआरपीसी कायदा १५१(१) प्रमाणे २४ आरोपींविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई केलेली आहे.

➢ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १४२ प्रमाणे गुन्हे शाखेने ५ तडीपार गुन्हेगारांवर कारवाई केलेली आहे.

➢ पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील एकुण ३९० हॉटेल, ढाबे व लॉजेस चेक, तसेच ८९ एस टी स्टॅण्ड/ रेल्वे स्थानक/ निर्जन ठिकाणे चेक करण्यात आले आहे.

➢ वाहतुक शाखेकडुन १०५७ संशयित वाहन चालकांना चेक करुन २९२ जणावंर वाहन धारकांवर कारवाई करुन रु. २,६८,०००/- दंड वसुल करण्यात आला आहे.

वरील प्रमाणे मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.रितेश कुमार, यांचे आदेशान्वये, मा.पोलीस सहआयुक्त, पुणे शहर, श्री.संदीप कर्णिक,मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे,मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, श्री. रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.अमोल झेंडे, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, संदीप सिंह गिल्ल, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील,मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, सुहेल शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४, श्री. शशिकांत बोराटे, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-५, श्री.विक्रांत देशमुख, मा.पोलीस उप आयुक्त,वाहतुक विभाग,श्री.विजयकुमार मगर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा व पोलीस ठाणेकडील अधिकारी / अंमलदार तसेच वाहतुक विभागाकडील अधिकारी / अंमलदार यांचे पथकाने संयुक्तपणे उपरोक्त कामगिरी केली आहे. यापुढेही कोंम्बींग ऑपरेशन राबविण्यात येवून गुन्हेगारांचे हालचालींवर सक्त नजर ठेवून त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

| अ.नं. | तपशील | एकुण कारवाया | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| १ | **आर्म्स ॲक्ट** | १३ | १३ |
| २ | **मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट** | ४३ | ४४ |
| ३ | **मपोका क १४२ प्रमाणे** | ५ | ५ |
| ४ | **जुगार ॲक्ट** | १९ | ४६ |
| ५ | **इतर विशेष कामगिरी (गुन्हे शाखा)** | ४ | ६ |
| ६ | **एनडीपीएस कारवाई** | १ | १ |
| **एकुण** | | ८५ | ११५ |